Vol III Issue IX March 2014

Impact Factor : 2.2052(UIF)

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 2.2052(UIF)**

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-9 | March-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# महिला सबलीकरणात शासनाची भुमिका

संभाजी वारंगुळेपाटील

सहयोगी प्राध्यापक मत्स्योदरी महाविद्यालय, जालना.

***सारांश :-***ज्या समाजातील व राष्ट्रातील स्त्री सक्षम असते तो समाज व राष्ट्र नेहमी सक्षम असतो हे वास्तव सत्य आहे. स्त्रीयांना राजकीय व आर्थिक स्वातंज्य देणे, कौटुंबिक व सामाजिक निर्णय प्रक्रियेत सामील करुन घेणे, तिच्या मताचा आदर करणे यामूधन त्यांचे व्यक्तीमत्त्व सुदृढ होते. विकास प्रक्रिया गतिमान करण्याची क्षमता स्त्रीयांमध्ये असल्याने समाज व राष्ट्राचा भक्कम आधार होऊ शकते.

## ***प्रस्तावना :***

प्राचीन काळापासून स्त्रियांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग अल्प राहिला आहे, यास जागातील कोणताही देश अपवाद नाही. भारतात कोणताही निर्णय घेण्यास स्त्रियांवर मोठ्या प्रमाणावर बंधने लादलेली होती. त्यामुळे सामाजिक, आर्थिक व राजकीय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग कमी राहिलेला आहे. भारतीय अर्थ व्यवस्थेच्या विकास दराचा विचार करता द्विअंकी दराने वाटचाल चालू आहे. त्यामुळे तेवढ्याच गतीने देशात विविध गंभीर समस्या निर्माण होत आहेत. भारतीय समाजव्यवस्थेची घडी व्यवस्थित चालवण्यासाठी पुरुष व स्त्री हे दोन्ही अतिशय महत्त्वाची असतात. मात्र स्त्रीयांकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष करण्यात आले. आजही स्त्री विकासाच्या प्रवाहापासून वंचित व उपेक्षीत आहे. भारतातील पुरुषप्रधान समाजव्यवस्था, पितृसत्ताक कुटुंब पध्दती व स्त्रीयांचा निकृष्ट दर्जा यामुळे स्त्री दुर्लक्षीत राहिलेली आहे.[१]

स्वातंज्य प्राप्तीनंतर स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून सरकारने विविध पातळीवर प्रयत्न करण्यास सुरुवात केली. भारत सरकारने १९७0 मध्ये स्त्रीविषयक समस्यांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने एक समिती नेमली. या समितीच्या शिफारसीनुसार स्त्रियांचा देश उभारतणीतील सहभाग वाढविण्याच्या हेतुने त्यांना प्रशिक्षित करण्याची गरज आहे, असे स्पष्ट करण्यात आले.[२] खऱ्या अर्थाने देशात स्त्री सक्षमीकरणाच्या चर्चेस सुरुवात झाली. पाचव्या योजनेपासून महिलाकडे पाहण्याचा दृष्टीकोन केवळ महिला कल्याण न राहता महिला विकास असा बदलला आहे. भारतात मागील चार दशकापासून तळागाळातील स्त्रीयांच्या संघटनामुळे स्त्रीवादी चळवळ आणखी विकासाकडे मार्गक्रमण करत आहे.

### संशोधनाची उद्दिष्टये

१. महिला सक्षमीकरणाची संकल्पना अभ्यासने.
२. महिला सक्षमीकरणात शासनाच्या भुमिकेचा अभ्यास करणे.

### संशोधन पध्दती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला आहे. सदरील विषयाचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम आधार सामग्रीद्वारे माहिती संकलीत करण्यात आली आहे. ज्यात विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे, शासकीय व निमशासकीय संस्थाचे अहवाल इ. चा उपयोग केला आहे.

या शोधनिबंधामध्ये भारतातील महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करतांना शासनाची भुमिका कशा प्रकारची राहिलेली आहे, याचा अभ्यास करण्यात आला आहे.

### महिला विकासाची संकल्पना

महिला विकासाच्या संकल्पनेविषयी अनेक विचारवंतानी वेगवेगळी मत मांडली आहे. स्त्री मुक्तीचे पुरस्कर्ते महात्मा फुले यांच्या विचारानुसार महिलांशिवाय कुटुंबाचा, समाजाचा, देशाचा व जगाचा विकास होऊ शकत नाही. राजर्षी शाहू महाराज म्हणतात की, "महिलांना जेंव्हा माणूस म्हणून मान्यता मिळते, जेंव्हा

तिच्यासाठी शाळेचे दरवाजे व पुस्तकाची पाने उघडतात, जेंव्हा तिला ज्ञानाच्या उजेडात जाण्याची संधी मिळते तेंव्हाच समाजक्रांती, राज्यक्रांती व्हायला लागते." [३]
पं. जवाहरलाल नेहरु यांनी महिला विकासाबाबत असे म्हटले आहे की, "राष्ट्र व सामाजिक संघटना काय आहे? हे सांगण्याकरिता स्त्रियांचे स्थान व स्थिती माहित होणे आवश्यक आहे." [४] थोडक्यात, समाजाचा व देशाचा विकास व्हावा असे वाटत असेल तर महिला विकास, महिला सक्षमीकरण होणे अतिशय महत्त्वाचे आहे.

देशात राष्ट्रीय स्तरावर महिलांच्या समाजिक, आर्थिक विकासासाठी एकात्मिक ग्रामविकास कार्यक्रम (IRDP), स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण कार्यक्रम (ट्रायसेम), ग्रामीण कारागिरांना सुधारीत साहित्य पुरविणे (STTRA) या योजनांचे एकत्रीकरण करुन 'स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSRY)' सुरु करण्यात आली. केंद्र सरकारने १९९९ पासून या योजनेअंतर्गत स्वयंसहायता गटाची स्थापना केली. त्यामुळे महिलांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक सक्षमीकरण होण्यास मदत होत आहे. स्त्री सक्षमीकरणात बचत गटाची भुमिका महत्त्वाची राहिलेली आहे. यामधून स्त्रियांचा वैयक्तिक विकास घडून येण्यासोबतच कुटुंबाचा आणि पर्यायाने समाजाचा देखील विकास होतो. म्हणजेच महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यावरोबर त्यांचा व्यक्तीमत्त्व विकास ही घडून येतो.

**राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण२००१ः**

सरकारने २००१ मध्ये महिला सबलीकरण धोरण तयार केले. महिलांच्या पूर्णक्षमतेचा विकास करण्याकरिता योग्य व पोषक वातावरण निर्माण करणे, महिलांना राजकीय, समाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्वांतत्र्य उपलब्ध करुन देणे, मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत महिलांना समान सहभाग उपलब्ध करुन देणे, आरोग्य, उच्चशिक्षण, व्यावसायिक शिक्षण, शासकीय कार्यालयात महिलांना समान प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देणे व महिलाविरुध्द होणारी सर्व प्रकारची हिंसा संपुष्टात आणणे यासारखी कार्ये या धोरणाच्या माध्यमातून केली जात आहे. ५ या सर्व उद्दिष्टाच्या पुर्ततेसाठी ८ मार्च २०१० पासून राष्ट्रीय महिला सबलीकरण अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानास 'मिशन पूर्ण शक्ती' असे नाव देण्यात आले आहे.

**महिला सक्षमीरणाच्या निवडक योजना**

महिलांच्या निर्णय प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभागामुळे प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शक होण्यासोबत अधिक संवेदनशील होते असा विश्वास आहे. त्याच दिशेने शासनाचे प्रयत्न सुरु आहे. त्यासाठी विविध योजना व कार्यक्रम सुरु करण्यात आलेले आहे. मात्र काही निवडक महिला कल्याण योजना पुढीलप्रमाणे आहे.

१. स्टेप (STEP)

महिलासाठी शिक्षण व रोजगार कार्यक्रमास मदत म्हणून स्टेप ही योजना १९८६८७ यावर्षी सुरु केली. महिलांमध्ये कौशल्यवृध्दी करणे, त्यांना संघटित करणे, सहकारी गटाच्या माध्यमातून मार्केटिंग लिंकेज मजबूत करणे, आधारभूत सेवा आणि कर्ज उपलब्ध करुन देणे, शाश्वत रोजगाराची व्यवस्था निर्माण करणे या मुख्य उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत विविध २५० प्रकल्पांना अर्थसहाय्य केले जाते. ज्यात कृषी, पशूसवंर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, हातमाग, खादी व ग्रामोद्योग, रेशीम उद्योग, पडीकभूमी विकास व सामाजिक वनीकरण या १० पारंपारिक क्षेत्रांचा सामावेश आहे. [६]

२. स्वाधार (Swadher)

संकटात सापडलेल्या महिलांसाठी स्वाधार ही योजना २००१०२ मध्ये सुरु करण्यात आली. कोणताही सामाजिक आर्थिक आधार नसणाऱ्या व विविध अडचणीत जीवन जगणाऱ्या वंचीत मुलीमहिला यांना मुलभूत व प्राथमिक गरजा उपलब्ध करणे, मानसिक आधार व योग्य समुपदेश करणे, शिक्षण व प्रशिक्षण याद्वारे सामाजिक आर्थिक पुनर्वसन करणे, गरजु महिलांना औषधी, न्यायालयीन आणि इतर सेवाची तरतूद करणे यासारखे मुख्य उद्देश ही योजना सुरु करण्यामागे आहे. संकटात असणाऱ्या महिलांना मदतीसाठी देशात जानेवारी २०११ पर्यंत ३३१ स्वाधार केंद्रे व २२३ महिला मदत केंद्रे स्थापन झाली आहे.

३. प्रियदर्शिनी (Priydarshini)

आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) च्या मदतीने मध्यगंगा मैदानातील महिला सबलीकरण व उपजिविका उपलब्ध करण्यासाठी 'प्रियदर्शिनी' कार्य क्रम राबविला जात आहे. यात उत्तरप्रदेशातील चार जिल्हे व बिहारमधील दोन जिल्हे याचा सामावेश आहे. या भागात हा कार्यक्रम १३ विविध गटात प्रायोगिक तत्त्वावर चालविला जात आहे.

या कार्यक्रमांतर्गत महिलांचे सामाजिक आर्थिक सबलीकरण घडवून आणण्यासाठी किशोरवयीन मुली व महिलांचे स्वयं सहाय्यता गट स्थापन केले जात आहे. यासोबत महिलांचे राजकीय, कायदेशीर आणि आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाते. या कार्य क्रमाची अंमलबजावणी नावार्डद्वारे केली जात आहे, ज्यामध्ये २०१६१७ पर्यंत ७२०० स्वयं सहाय्यता गट स्थापन करुन एक लाख कुटुंबाचा सामावेश करण्याचे ध्येय आहे.

४. उज्वला

भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने 'उज्वला' ही सर्वसमावेशी योजना ४ डिसेंबर २००७ या दिवशी सुरु केली. जिचा मुख्य उद्देश

महिलांच्या होणाऱ्या अनैतिक मानवी व्यापारास प्रतिबंध घालणे हा आहे. या योजनेची अंमलबजावणी गैर सरकारी संघटना (NGOs) च्या साहाय्याने केली जाते. या योजनेचे प्रतिबंध (Prevention), बचाव (Rescur), पनुरवसन (Rehabilitation), पुनरएकात्मीकरण (Reintegration), स्वदेशी पाठवणूक (Rehabilitation) असे ५ घटक आहेत.

या योजनेद्वारे सामूहिक सतर्कता गट, किशोरवयीन गट याची स्थापना करणे, जाणीव निर्मिती, कार्यशाळा यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. शोषित स्थानाहून पिडित महिलांना सुरक्षित बाहेर काढले जाते. विविध सेवा पुरवून पिडित महिलांचे पुनर्वसन व समाजाशी पुन्हा एकात्मीकरण घडवून आणण्याचे काम देखील केले जात आहे.[७]

या योजनेअंतर्गत पात्र NGOs यांना वरील कार्ये करण्यासाठी सहाय्य केले जाते. आजपर्यंत १४७ प्रकल्पांना मान्यता दिली आहे. ज्यात ७४ पुनर्वसन गृहांचा सामावेश आहे.

५. सबला

देशातील किशोरवयीन मुलींच्या सवलीकरणासाठी 'सबला'क्त या योजनेची सुरुवात करण्यात आली. देशात आज २०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी लोकसंख्या वास्तव्यास आहे. त्यापैकी किशोरवीयन मुलींची संख्या १७ टक्के आहे. देशाच्या राष्ट्रीय विकासात एक महत्त्वपूर्ण संसाधन म्हणून वापर केला जाऊ शकतो. म्हणून त्यांच्या आरोग्य व विकास याद्रुष्टीने केलेली गुंतवणूक राष्ट्राच्या हितावीच आहे, यात दुमत नाही. या सर्व बाबीचा विचार करुन १९ नोव्हेंबर २०१० रोजी देशातील २०० जिल्ह्यात ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबविली जात आहे. ही योजना राज्यसरकारे व केंद्र सरकार यांच्या संयुक्त प्रयत्नाने चालविली जाते. अंगणवाडी केंद्र या योजनेअंतर्गत सेवा प्रदान करण्यासाठी केंद्र बिंदू म्हणून कार्य करत आहे.[८]

थोडक्यात, सरकार महिला सवलीकरणासाठी ज्या विविध योजना व कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. त्या योजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी झाल्यास महिलांचा सर्वांगिण विकास घडून येईल. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात एकूण लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण ४८.४६ टक्के आहे. म्हणून देशाच्या शाश्वत विकासासाठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक विकास होणे गरजेचे आहे.[९]

संदर्भसुची

१. अहिरे प्रतिभा (२०११) ः 'स्त्री विकासः भ्रम आणि वास्तव', लेख (भाषा, राजकारण आणि विकास या संपादकीय पुस्तकात), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. १३९.
२. गिरगावकर योगेश (२०१२) ः 'ग्रामीण भारतः एक चिंतन', साधना प्रकाशन, परभणी, पृ.क्र. १३०.
३. कांबळे उत्तम (२००३) ः 'राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती', सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ५.
४. गुप्ता सत्यप्रकाश (१९९४) ः 'नेहरुजी के स्त्रियों के प्रति विचार', समाजकल्याण मासिक, केंद्रीय समाजकल्याण बोर्ड, दिल्ली, पृ.क्र. ३.
५. भोगे कृष्णा (नोव्हेंबर २०१३) ः 'महिला विकास', दै. सकाळ वृत्तपत्र, दि. १८ नोव्हेंबर २०१३, पृ.क्र. ८.
६. कोळंबे रंजन (जुलै २०१२) ः 'मानव संसाधन विकास व मानवाधिकार', भगीरथ प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ११५११६.
७. www.wcd.nic.in/icds/
८. www.childlineindia.org.in
९. भारत सरकार (२०११) ः '२०११ चा जनगणना अहवाल', नवी दिल्ली.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net